२६ मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणांना सुधारीत
अर्थसहाय्याचा आकृतीबंध लागू करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-मत्स्यवि-२०००/२०७४६/प्र.क्र.१६२/पदुम १३**
**मंत्रालय विस्तार,मुंबई-४०००३२.**
**दिनांकः-१२ नोव्हेंबर,२००१.**

वाचा:- १) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र.मत्स्यवि-१९९०/सीआर-३८७/
पदुम-१३,दिनांक:- १७.१२.९२.
२) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र.मत्स्यवि-१९९२/सीआर-२३/
पदुम-१३,दिनांक:- १७.३.९३.
३) केंद्र शासनाचे क्र.३१०११/१/१६-एफवाय (३),दिनांक १०.७.२००० चे पत्र.

**प्रस्तावनाः-**

महाराष्ट्र राज्यात केंद्र शासन पुरस्कृत मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा कार्यरत आहेत. मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणांचा अर्थसहाय्याचा आकृतीबंध केंद्र व राज्य यांच्यात ५०:५० अशा हिश्याने होता. आता केंद्र शासनाने क्र.३१०११/१/९६-एफवाय (३),दिनांक १०.७.२००० च्या पत्रान्वये या २६ मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणांना केंद्र व राज्य यांच्या ७५:२५ अशा हिश्याने योजनेतील काही बाबी वाढवून मंजूरी दिलेली आहे. यास्तव केंद्र शासनाने २६ मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणांच्या काही बाबी वाढवून मंजूर केलेला सुधारित अर्थसहाय्याचा आकृतीबंध लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**:-

केंद्र पुरस्कृत २६ मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणांना सोबत जोडलेल्या विवरणपत्र अ नुसार, बाबनिहाय,अर्थसहाय्याचा सुधारीत आकृतीबंध लागू करण्यास मंजूरी देत आहे.

२.	**बिगर आदिवासी जिल्हयातील यंत्रणेबाबतचा खर्च**

२४०५-मत्स्यव्यवसाय
१०१ भूजल मत्स्यव्यवसाय
(०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
(०२) (०३) मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा
राज्य योजनांतर्गत योजना,
४१-सहाय्यक अनुदान (२४०५ ०१६४)
व
(०२) (०४) केंद्र पुरस्कृत योजना
४१ सहाय्यक अनुदान (२४०५ ०८२५)

**आदिवासी जिल्हयातील यंत्रणेचा खर्च**

२४०५-मत्स्यव्यवसाय
पंचवार्षिक योजनांतर्गत योजनांतर्गत योजना,
जनजाती क्षेत्र उपयोजना
१०१ भूजलशयीन मत्स्यव्यवसाय
(३) मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा,
४१ सहायक अनुदान
(ए) राज्य योजनांतर्गत योजना (२४०५ ०५३१)
व
(बी) केंद्र पुरस्कृत योजना (२४०५ ०५४९)

**अनुसूचित जमातीसाठी विशेष घटक योजना, यंत्रणेचा खर्च**

२४०५-मत्स्यव्यवसाय,
१०१-भूजल मत्स्यव्यवसाय
(०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
(०२) (०९) मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा
राज्य योजनांतर्गत योजना
अनुसूचित जमातीसाठी विशेष घटक योजना
४१ सहायक अनुदान (२४०५ ०८२५)
व
(०२) (१०) केंद्र पुरस्कृत योजना

**अनुसूचित जमातीसाठी विशेष घटक योजना**

४१ सहाय्यक अनुदान (२४०५ ०९८८) या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. जर अनुदाना व्यतिरिक्तचा खर्च लाभधारकाने स्वतः सोसला आणि संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणांसाठी नियुक्त केलेल्या व्यवस्थापकीय समितीने हे प्रमाणित केले तर, या योजनेअंतर्गत मंजूर बाबनिहाय लाभार्थीना देण्यात येईल. मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणेच्या कार्यक्रमांतर्गत बाबींसाठी अनुदाना व्यतिरिक्तची,बाबनिहय, रक्कम पुढाकार घेणाऱ्या बँका (Lead Banks) किंवा भाग घेणाऱ्या बँका (Participating Banks) यांचेकडून मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणेमार्फत कर्जरुपाने लाभार्थीना उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. या योजनेचा भौतिक आणि आर्थिक साध्य उद्दिष्टाबाबतचा त्रैमासिक/वार्षिक प्रगती अहवाल यापुर्वी विहीत केलेल्या नमुन्यात नियमितपणे प्रत्येक तिमाहीच्या अखेर शासनास सादर करावा.

५. मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणांची खाती,यंत्रणांनी नियुक्त केलेल्या,सनदी लेखापाल (Chartered Accountant) आणि/किंवा आवश्यकता असल्यास नियमानुसार केंद्र शासनाच्या/राज्य शासनाच्या,तत्सम अधिकाऱ्याकडून लेखा परिक्षण करण्यात यावे आणि त्याचा अहवाल केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयास कळविण्यात यावा व तसे राज्य शासनाच्या निदर्शनास आणण्यात यावे.

६. केंद्र शासनाच्या हिश्यापोटी अगोदरच्या वर्षी (Preceeding year) वेळोवेळी मंजूर केलेल्या रक्कमेचा सविस्तर तपशिल प्रगती अहवाल आणि त्यात काही तूट (Shortfall) असल्यास त्याची कारणे,इत्यादी बाबींची तपशिलवार माहिती प्रस्ताव पाठविताना त्यासोबत पाठवावी. तसेच राज्य शासनाच्या अर्थसंकल्पात सदर योजनेकरिता उपलब्ध केलेल्या तरतूदीबाबत विशेषकरुन (Specifically) उल्लेख करण्यात यावा.

७. हे आदेश नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ प्र.क्र.३४५/व्यय-१,दिनांक १७.१०.२००१ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(श्या.ना.धकाते),
उपसचिव,महाराष्ट्र शासन

कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

प्रति,

आयुक्त मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य,मुंबई
आयुक्त,आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य,मुंबई
संचालक,आदिवासी विकास,नाशिक
अतिरिक्त आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक/नागपूर
संचालक,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे
सर्व प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
महालेखापाल-१,महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा),मुंबई
महालेखापाल-२,महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा),नागपूर

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी | पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर/औरंगाबाद/परभणी/लातूर/बुलढाणा/अकोला/अमरावती/ठाणे/बीड/नांदेड/जळगांव/अहमदनगर/नाशिक/जालना/उस्मानाबाद/वर्धा/धुळे/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/यवतमाळ |
| मुख्य कार्यकारी अधिकारी मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा | |
| जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी | |
| कार्यकारी अभियंता,पाटबंधारे, जिल्हा परिषद | |
| जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | |
| जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था | |
| जिल्हा कोषागार अधिकारी | |

जिल्हाधिकारी,सदस्य सचिव,जिल्हा नियोजन व विकास मंडळ,नागपूर/गडचिरोली/यवतमाळ/चंद्रपूर/भंडारा
विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,नागपूर/अमरावती
प्रक्ल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प रामटेक,जिल्हा-नागूपर/गडचिरोली
अध्यक्ष,चांदा जिल्हा मत्स्यव्यवसाय सहकारी संघ मर्यादित,चंद्रपूर
चेअरमन,विदर्भ विभागीय मच्छिमार सहकारी संघ,नागपूर
अध्यक्ष, यवतमाळ जिल्हा मच्छिमार सहकारी संघ, यवतमाळ
अधिक्षक अभियंता,पाटबंधारे मंडळ,अमरावती/नागपूर
आदिवासी विकास विभाग,मंत्रालय(कार्यासन ४,७ व १७)
पाटबंधारे विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
वित्त विभाग,व्यय-१,मंत्रालय,मुंबई-३२.
कार्यासन अधिकारी,पदुम-१२,पदुम-१४,पदुम-१६,कृषि व पदुम विभाग,मुंबई-३२.
सचिव,केंद्र शासन,भारत सरकार,कृषि मंत्रालय (कृषि व सहकार विभाग),कृषि भवन,नवी दिल्ली.
सहसंचालक,लेखा व कोषागारे,संगणक कक्ष,नवीन प्रशासकीय भवन,५ वा मजला, मुंबई (२ प्रती)
निवड नस्ती

## विवरणपत्र-अ

केंद्र पुरस्कृत मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा या योजनेच्या सुधारीत अर्थसहाय्याच्या आकृतीबंधास मंजूरी देणारे विवरणपत्र.

| **अ.क्र.** | **योजनेतील बाब निहाय केंद्र व राज्य यांच्या अनुक्रमे ७५:२५ हिश्श्यांचा तपशील (अनुक्रमांक १० वगळून)** | **दर** |
|---|---|---|
| | चालू घटक | |
| १. | लाभार्थांच्या जमिनीवर नवीन तळे आणि तलाव बांधकाम,सुव्यवस्थित पाणी घेण्याची सुविधा,पाणी सोडण्याची सुवधिा आणि उथळ नलिका विहिरीसह (Shallow tubewell) | १) सपाट भागात प्रति हेक्टरी खर्च रु.२ लाख<br>अनुदान-एकूण खर्चाच्या २० टक्के परंतु जास्तीत जास्त रु.४०,०००/- प्रतिहेक्टर अनुसूचित जाती/अनुसूचित जामातीचे शेतकरी वगळून सर्व शेतकयांसाठी व २५ टक्के परंतु जास्तीत जास्त रु.५०,०००/- प्रतिहेक्टर अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या शेतकयांसाठी.<br>२) डोंगराळ जिल्हयात प्रति हेक्टरी खर्च रु.३ लाख<br>अनुदान-एकूण खर्चाच्या २० टक्के परंतु जास्तीत जास्त रु.६०,०००/- प्रतिहेक्टर अनुसूचित जाती/अनुसूचित जामातीचे शेतकरी वगळून सर्व शेतकयांसाठी व २५ टक्के परंतु जास्तीत जास्त रु.७५,०००/- प्रतिहेक्टर अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या शेतकयांसाठी. |
| २. | तळयाचे/तलावाचे पुनःप्रदान (Reclamation) / नतूनीकरण | आवश्यक खर्च रु.६०,०००/- प्रति हेक्टर.<br>अनुदान-एकूण खर्चाच्या २० टक्के परंतु जास्तीत जास्त रु.१२,०००/- प्रतिहेक्टर अनुसूचित जाती/अनुसूचित जामातीचे शेतकरी वगळून सर्व शेतकयांसाठी व २५ टक्के परंतु जास्तीत जास्त रु.१५,०००/- प्रतिहेक्टर अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या शेतकयांसाठी. |

| | | |
|---|---|---|
| ३. | प्रथम वर्षासाठी निविष्ठा (Input) (मत्स्यबीज, मत्स्यखाद्य,रासायनिक खते,सेंद्रीय खते आणि मत्स्यरोग टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय (ई.यू.एस) | आवश्यक खर्च रु.३०,०००/- प्रति हेक्टर अनुदान-एकूण खर्चाच्या २० टक्के परंतु जास्तीत जास्त रु.६,०००/- प्रतिहेक्टर अनुसूचित जाती/अनुसूचित जामातीचे शेतकरी वगळून सर्व शेतकयांसाठी व २५ टक्के परंतु जास्तीत जास्त रु.७,५,००/- प्रतिहेक्टर अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या शेतकयांसाठी. |
| ४. | डोंगराळ भागातील वाहत्या पाण्यात मत्स्यसंवर्धन | प्रति १०० चौरस मीटरच्या घटकासाठी (unit) खर्च रु.२०,०००/- (मत्स्यसंवर्धनासाठी आवश्यक असलेल्या निविष्ठाच्या (Input) च्या रु.४०००/- च्या खर्चाच्या अंतर्भावासह)<br>अनुदान-एकूण खर्चाच्या २० टक्के परंतु जास्तीत जास्त रु.४,०००/- प्रतिहेक्टर अनुसूचित जाती/अनुसूचित जामातीचे शेतकरी वगळून सर्व शेतकयांसाठी व २५ टक्के परंतु जास्तीत जास्त रु.५,०००/- प्रतिहेक्टर अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या शेतकयांसाठी.<br>हे अनुदान प्रति शेतकरी लाभार्थीला जास्तीत जास्त ३ युनिटसाठी अनुज्ञेय राहील |
| ५. | एअरेटर/पंप | रु.५०,०००/- प्रति संच दोन एअरेटर (एक अश्वशक्तीचा) किंवा एक डिझेल पंप (पांच अश्वशक्तीचा)<br>अनुदान-२५ टक्के परंतु जास्तीत जास्त रु.१२,५००/- प्रति संच एअरेटर/पंप सर्व लाभार्थीसाठी ज्यांनी ३००० किलो प्रतिहेक्टरी प्रतिवर्षी मत्स्य उत्पन्न घेतले आहे व त्यात पुढे वाढ होणार आहे. एक हेक्टर मत्स्यतळयासाठी,जास्तीत जास्त दोन एअरेटर/पंप (एक अश्वशक्तीचे) किंवा एक डिझेल पंप (पाच अश्वशक्तीचा) अनुज्ञेय राहील. |
| ६. | गोडया पाण्यातील मत्स्यबीज उबवणी केंद्र | सपाट भागात रु.८ लाख खर्च प्रति १० |

| | | |
|---|---|---|
| | | मिलियन फ्रायच्या क्षमतेच्या मत्स्यबीज उबवणी केंद्रासाठी आणि डोंगराळ भागात रु.१२ लाख खर्च प्रति १० मिलियन फ्रायच्या क्षमतेच्या मत्स्यबीज उबवणी केंद्रासाठी.<br>अनुदान- खर्चाच्या १० टक्के परंतु रु.८०,०००/- पेक्षा जास्त होणार नाही असे सपाट भागात आणि रु.१.२० लाख डोंगराळ भागात,फक्त उद्योजकांसाठी (Entrepreneurs) |
| ८. | मत्स्यखाद्य विभाग (Unit) | मत्स्यखाद्य विभागचे बांधकाम,यंत्रसामुग्री आणि आवश्यक साधने (equipment) यासाठी एकूण खर्च रु.२५ लाख मत्स्यखाद्य विभाग (Unit) हे खाजगी क्षेत्रात उभारता येतील.<br>अनुदान- खर्चाच्या २० टक्के परंतु जास्तीत जास्त रु.५ लाख अनुज्ञेय राहील. |
| ९. | मत्स्यशेतकयांना प्रशिक्षण | प्रशिक्षण कालावधी १० दिवस रु.५० प्रती दिवस प्रतिलाभार्थी विद्यावेतन अनुज्ञेय राहील. आणि प्रवासासाठी खर्च आणिक क्षेत्रीय भेटीसाठीचा खर्च ठोक रक्कम रु.१००/- अनुज्ञेय राहील. |
| १०. | वाहन खरेदी | प्रत्येक नवीन मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणेसाठी वाहन खरेदीसाठी वाहनाच्या किंमतीच्या ५० टक्के खर्च किंवा वाहन पूर्णस्थापन (replace) (दुसरे वाहन) करण्यासाठी वाहनाच्या किंमतीच्या ५० टक्के खर्च अनुज्ञेय राहील. |
| | नवीन घटक | |
| ११. | राज्य स्तरावर मोठे,गोडया पाण्यातील कोळंबी बीज उबवणी केंद्र स्थापन करण्यासाठी (प्रत्येक राज्यासाठी एक) आणि लहान उबवणी केंद्र (लाभार्थीसाठी) | १) २५ मिलियन पीएल प्रतिवर्षी क्षमतेच्या प्रत्येक मोठया उबवणी केंद्रासाठी (गोडया पाण्यातील कोळंबी बजी उबवणी केंद्र) खर्च रु.३० लाख प्रत्येक राज्यांत राज्यस्तरीय उबवणी केंद्र स्थापन करण्यासाठी हे अनुदान केवळ एकदाच अनुज्ञेय राहील.<br>२) ५-१० मिलियन पीएल प्रतिवर्षी क्षमतेच्या प्रत्येक लाहन उबवणी केंद्रासाठी एकूण खर्च |

| | | |
|---|---|---|
| | | रु.८लाख<br>अनुदान- खर्चाच्या २० टक्के परंतु जास्तीत जास्त १.६० लाख प्रति उद्योजकास (Entrepreneurs) फक्त. |
| १२. | पाण्याची प्रत आणि मत्स्यप्रकृती चांचणीसाठी राज्यस्तरीय प्रयोगशाळा स्थापन करणे | एकूण खर्च रु.३० लाख प्रति प्रयोगशाळा (रु.२५ लाख इमारत बांधकाम आणि रु.५ लाख आवश्यक साधने,काचेचे सामान व रसायने इ) |
| १३. | प्रत्येक मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणेला माती आणि पाणी परिक्षणासाठी संच उपलब्ध करणे. | माती आणि पाणी परिक्षणासाठीच्या प्रतीसंचाची किंमत रु ३०,००० /- प्रत्येक मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणेला असा संच केवळ एकदाच मंजूर करण्यात येईल व एकदाच अनुदान अनुज्ञेय राहील. |
| १४. | शोभिवंत माश्यांसाठी उबवणी केंद्रासह एकात्मिक विभागाची (unit) उभारणी | ५ ते १० मिलियन (फ्राय) क्षमता असलेल्या प्रति उबविणी केद्राचा एकूण खर्च रु १५ लाख. अनुदान- खर्चाच्या १० टक्के परंतु जास्तीत जास्त रु १.५० लाख सर्व मत्स्यसंवर्धकांसाठी अनुज्ञेय राहील. |
| १५ | मस्य/ कोळंबी बीजाची वाहतूक | हे फक्त डोंगराळ भागाकरिता लागू राहील. अनुदान -१०० फ्रायच्या वाहतुकीसाठी रु २०/- सर्व मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणेसाठी अनुज्ञेय. हे वैयक्तिक मत्स्य शेतक-यांना लागू नाही. |

१) मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा कार्यक्रमांतर्गत उपरोक्त सहाय्य प्रती लाभाथी केवळ एकदाच अनुज्ञेय आहे.

२) नवीन तळयाचे आणि तलावाचे बांधकाम, तळयाचे/ तलावाचे पुन.प्रापण (reclamation ) /नुतनीकरण आणि प्रथम वषी निविष्ठासाठी वैयक्तिक लाभार्थीला १ हेक्टरपेक्षा कमी, पासून ५ हेक्टर पर्यत, वित्तीय संस्थांसह किंवा वित्तीय संस्थाशिवाय सपाट विभागात उपलब्ध आहे आणि १ हेक्टर डोंगराळ जिल्हयांत पूर्व नमुद दराच्या प्रमाणात (pro rate basis )उपलब्ध आहे.

3) राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय सहकारी संघाकडून, मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थाना, विकासात्मक कांमासाठी उपरोक्त अर्थसहाय्य अनुदानाच्या स्वरुपात सुध्दा उपलब्ध आहे.